# मुंबई विद्यापीठ

# परिपत्रक

क्र.नि.वि./इएल/सिनेट-२५(२)(पी)/४३-जी/२०१०
दिनांक ९ डिसेंबर, २०१०
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २५(२)(पी) नुसार
अधिसभेवर (२०) शिक्षकांची निवडणूक
निवडणूकीची तारीख बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१०
(सकाळी •.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)

कृपया वर नमुद केलेल्या विषयावरील अधिसूचना क्रमांक नि.वि.इएल/सिनेट-२५(२) (पी)/४३ फ २०१० दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० चे अवलोकन करावे.

संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठीय संस्था आणि मान्यताप्राप्त संस्था आणि सर्व संलग्न महाविद्यालये/स्वायत्त महाविद्यालये/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि सर्व मतदार ज्यांनी त्यांची नांवे शिक्षक मतदार यादीत नोंदविलेली आहेत यांच्या माहितीकरिता त्यांना याद्वारे असे अधिसुचित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(पी) यासह कलम २४(ए) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे खालील उमेदवारांचे नामनिर्देशन योग्य प्रकारे आढळल्याने अधिसभेवर २० (वीस) शिक्षकांच्या निवडणूकीसाठी नामनिर्देशित करण्यात आलेली आहेत. त्यांचे नामनिर्देशन योग्य आहे असे आढळून आले आहे.

वर नमूद केलेल्या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शिक्षकांच्या २० (वीस) जागांसाठीची निवडणूक घेण्यात येईल ती अशी :- सर्वसाधारण प्रवर्ग (०४ जागा - कला शाखेतील शिक्षकांसाठी) (०३ जागा - विज्ञान शाखेतील शिक्षकांसाठी) (०४ जागा-तंत्रज्ञान शाखेतील शिक्षकांसाठी)(०१ जागा - विधी शाखेतील शिक्षकांसाठी) (०२ जागा-वाणिज्य शाखेतील शिक्षकांसाठी)(०१ जागा-फाईन आर्टस् शाखेतील शिक्षकांसाठी)

आणि

(०१ जागा -महिला गट क्र. १- कला शाखेतील शिक्षकांसाठी) ( 0१ जागा - महिला गट क्र. २- विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील शिक्षकांसाठी) ( १ जागा - महिला गट क्र. ३ -तंत्रज्ञान, विधी आणि ललित कला (फाईन आर्ट) शाखेतील शिक्षकांसाठी) आणि ( १ जागा - विमुक्त जाती भटक्या जमाती (DTNT) आणि (१ जागा - इतर मागास वर्गीय (OBC) सर्व विद्या शाखेतील शिक्षकांसाठी)

१. परिनियम ३६३(ब) मधील तरतुदीनुसार आवश्यक असलेल्या वरील निवडणूकीसाठी योग्य प्रकारे नामनिर्देशन केलेल्या उमेदवारांचे पूर्ण नाव, पदनाम आणि पत्ता खालील प्रमाणे आहे :-

## कला शाखेतील शिक्षकांसाठी (४ जागा)

| क्र. | उमेदवाराचे नांव | हुद्दा | क्र. | उमेदवाराचे नांव | हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अडसुळे जालिंदर<br>ADSULE JALINDER<br>३/७९, नविन<br>एम.आय.जी. कॉलनी, वांद्रे(पू.),<br>मुंबई-४०००५१. | निवड श्रेणी | ५ | पांडे आद्या प्रसाद<br>PANDE AADYAPRASAD<br>६०४/ए, संडयू, फेस-२,<br>स्वस्तिक पार्क, व्हीलेज रोड,<br>भांडुप(प.) मुंबई-४०००७८ | सहयोगी प्राध्यापक |
| २ | देशमुख महादेव श्रीरंग<br>DESHMUKH MAHADEV SHRIRANG<br>सी-३, निकुंज,पी.एल.<br>१४,सेक्टर-४,<br>खारघर, नवी मुंबई-४१०२१०. | सहाय्यक प्राध्यापक | ६ | पेडणेकर हेमंत मंगेशराव<br>PEDNEKAR HEMANT MANGESHRAO<br>६, कर्मचारी वसाहत, किर्ती<br>महाविद्यालय, काशिनाथ धुरू<br>रोड,दादर(प),मुंबई ४०००२८ | सहयोगी प्राध्यापक |
| ३ | खामकर बबन महिपती<br>KHAMKAR BABAN MAHIPATI<br>ए/पी-आशिये<br>(बानेवाडी), ता. कणकवली,<br>जि.सिंधुदुर्ग-४१६६०२ | सहयोगी प्राध्यापक | ७ | शेंद्रे अविनाश भालचंद्र<br>SHENDRE AVINASH BHALCHANDRA<br>बी-३०३, सुविधी दर्शन,<br>नामदेव पाटील वाडी, पठाणी<br>रोड, डोंबिवली (पू) ४२१२०१ | सहाय्यक प्राध्यापक |
| ४ | /मुकादम मोहसिना अब्दुलकादर<br>MUKADAM MOHASINA ABDULKADAR<br>९-ब, २०३, निलम नगर,<br>फेस-२, गवाणपाडा, मुलुंड(पू.),<br>मुंबई-४०० ०८१. | सहयोगी प्राध्यापक | ८ | वाघ संदेश माधवराव<br>WAGH SANDESH MADHAVRAO<br>ए-७ गृहस्वप्न को.हा.सो.<br>गुलमोहर क्रॉस रोड नं.४,<br>जुहू, मुंबई-४०००४९. | सहाय्यक प्राध्यापक |

/महिला

## विज्ञान शाखेतील शिक्षकांसाठी (३ जागा)

| क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा | क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | /गोडबोले संगिता अतुल<br>GODBOLE SANGITA ATUL<br>फ्लॅटए/१०३, बिल्डिंग क्र.८१, चेंबुर अभय को.हॉ.सो., टिळक नगर,चेंबुर, मुंबई-४०० ०८९. | सहयोगी प्राध्यापक | ६ | /परांजपे मधू सुधीर<br>PARANJPE MADHU SUDHIR<br>सी-७०२, धिरज रिजंसी, भोर समोर, डब्ल्यू. इ. हायवे, बोरिवली(पू.), मुंबई-४०००६६. | सहयोगी प्राध्यापक |
| २ | /कायंदे मनिषा श्यामसुंदर<br>KAYANDE MANISHA SHYAMSUNDER<br>५-२२/१ रुपल अपा.,९८ फालके रोड, दादर, मुंबई, -४०० ०१४. | अधिव्याखाता वरिष्ठ श्रेणी/ | ७ | पवार विजय नामदेव<br>PAWAR VIJAY NAMDEO<br>१००/४, गितांजली को.हा., वर्तक नगर, ठाणे(प.), -४०० ६०६. | सहाय्यक प्राध्यापक |
| ३ | लोखंडे मनोहर वैजनाथराव<br>LOKHANDE MANOHAR VAIJNATHRAO<br>ए/४०४, गॅलॅक्सी क्लासिक एबिसीडी को.हा.सो, मिठागर, बीएमसी पी साऊथ वार्ड समोर, गोरेगाव(प),मुंबई-४००१०४. | सहाय्यक प्राध्यापक | ८ | /रावळ सुवर्णा तुकाराम<br>RAWAL SUVARNA TUKARAM<br>ओम निवास, १७, सदिच्छा को. ऑप.हा.सो.,चूर्नीपाडा, रान्हल, ता. भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०२. | सहयोगी प्राध्यापक |
| ४ | मिश्रा बिंदुप्रकाश बेचन<br>MISHRA BINDUPRAKASH BECHAN<br>सी/४०४, गायत्री दर्शन, सुरूची हॉटेल जवळ, ठाकुर कॉम्लेक्स, कांदिवली (पू.) मुंबई-४०० १०१. | अधिव्याख्याता निवड श्रेणी | ९ | सुखटणकर किशोर वसंत<br>SUKHTANKAR KISHOR VASANT<br>कलानिकेतन अपार्टमेंटच्या समोर, हिंदू कॉलनी, मारूती मंदिर, रत्नागिरी-४१५ ६१२. | अधि-व्याख्याता |
| ५ | पगारे भगवान गोंविदराव<br>PAGARE BHAGWAM GOVINDRAO<br>सी/१/५०१, लोकसुरभी, गगनमुखी सीएचएस, कल्याण (प.), जि.ठाणे-४२१ ३०१. | सहयोगी प्राध्यापक | १० | वैद्य रजनीश बलदेव<br>VAIDYA RAJNISH BALDEV<br>शासकिय अधिकारी वसाहत, ५२१७/१८६,गुरूदत्त मंदिर रोड, पंत नगर, घाटकोपर(पू), मुंबई-४०० ०७५. | सहयोगी प्राध्यापक |

/महिला

## तंत्रज्ञान शाखेतील शिक्षकांसाठी (४ जागा)

| क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा | क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | बांबोले अभय एन.<br>BAMBOLE ABHAY N.<br>०१, ॲकॅडेमिक स्टाफ क्वार्टर्स, ओल्ड हॉस्टेल, आय.सी.टी. कॅम्पस, माटुंगा(पू), मुंबई-४०० ०१९. | सहाय्यक प्राध्यापक | ५ | करंदीकर रमेश गोपाळ<br>KARANDIKAR RAMESH GOPAL<br>४४, मैसूर कॉलनी, चेंबुर, मुंबई-४०० ०७४. | सहाय्यक प्राध्यापक |
| २ | भाटकर मंगलकुमार विश्वनाथ<br>BHATKAR MANGALKUMAR VISHWANATH<br>"ज्ञानेश्वरी" प्लॉट बी/२बी, डी ५०१, न्यू सातारा समूह सीएचएस, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१० २१०. | सहाय्यक प्राध्यापक | ६ | कुमार संजय<br>KUMAR SANJAY<br>बी३०२,सी व्ह्यू, न्यू रविराज कॉम्प्लेक्स, जेसल पार्क,भाईंदर (पू.), ४०१ १०५. | अधि-व्याख्याता |

.....३/-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | देशमुख विवेक बलवंतराव<br>DESHMUKH VIVEK BALWANTRAO<br>सी ६०४, इनटॉप हाईटस्, सेक्टर १९,एनएचपी शाळेजवळ, ऐरोळी, नवी मुंबई-४००७०८. | सहाय्यक प्राध्यापक | ७ | ⁄मजूमदार अनुराधा संदिप<br>MAJUMDAR ANURADHA SANDEEP<br>३१/२०२, कनाकिया, संस्कृती, ठाकुर कॉम्लेक्स, कांदिवली(पू), मुंबई-४०० १०१. | सहाय्यक प्राध्यापक |
| ४ | देशपांडे मनोज मुरलीधरराव<br>DESHPANDE MANOJ MURLIDHARRAO<br>बी/२०७, अजंटा इंमप्रेस सीएचएस, प्लॉट नं.५२, सेक्टर-१९,ऐरोळी, नवी मुंबई-४०० ७०८. | सहाय्यक प्राध्यापक | ८ | येरामारेडी श्रीनिवास राव<br>YERAMAREDI SHRINIVASARAO<br>४०३ ए, प्लॉट नं.८३, आरएससी-४८, गोराई श्री गणेश सीएचएस, गोराई II, बोरिवली (प.), मुंबई-४०००९२ | सहाय्यक प्राध्यापक |

⁄महिला

## विधी शाखेतील शिक्षकांसाठी ( १ जागा)

तसेच आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, विधी शाखेतील शिक्षकाच्या निवडणूकीसाठी कलम २५(२)(पी) मधील तरतूदीनुसार एका जागेसाठी खारिवाल सुनिता दशरथ (सहाय्यक प्राध्यापक) यांचा एकच नामनिर्देशन अर्ज योग्य प्रकारे असल्याचे आढळल्याने खारिवाल सुनिता दशरथ यांची अधिसभेवर विधी शाखेतील शिक्षकांमधुन बिनविरोध निवड झाली आहे, असे जाहिर करण्यात येत आहे.

## वाणिज्य शाखेतील शिक्षकांसाठी ( २ जागा)

| क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा | क्र | उमेदवाराचे नाव | हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | बिडवाइ दिपक गंगाधरराव<br>BIDWAI DEEPAK GANGADHARRAO<br>चिले चाळ, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी- ४१५२०३. | सहयोगी प्राध्यापक | ३ | राजू कृष्णमा एस.<br>RAJU KRISHNMA S.<br>२/८, बी विंग, पूर्णिमा सीएचएस, श्रीनगर कॉलनी, एम. जी. रोड, गोरेगाव(प.), मुंबई-४०००६२ | सहयोगी प्राध्यापक |
| २ | पवार प्रल्हाद गंगाराम<br>PAWAR PRALHAD GANGARAM<br>ए-२०३, आर्य उदय सीएचएस, प्लॉट नं.९, सेक्टर ४, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८ | अधिव्याख्याता | ४ | सागर शरनाप्पा गोविंदराव<br>SAGAR SHARNAPPA GOVINDRAO<br>निर्मल निवास, वृंदावन नगर, ब्राह्मण आळी, सावरोळी रोड, शहापूर, जि. ठाणे-४२१६०१. | सहयोगी प्राध्यापक |

## ०१ जागा-फाईन आर्टस् शाखेतील शिक्षकांसाठी

**फाईन आर्टस शाखेतील निवडणूकीसाठी एकही नामनिर्देशन अर्ज प्राप्त न झाल्याने निवडणूक होणार नाही.**

## महिला गट क्र. १ - कला शाखेतील शिक्षकांसाठी (१ जागा)

| क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | ⁄गोस्वामी चित्रा मिलिंद<br>GOSWAMI CHITRA MILIND<br>वैभवरत्न अपा., बी-११३, जुना माल नाका, रत्नागिरी-४१५ ६१२. | सहाय्यक प्राध्यापक |
| २ | ⁄निकम माधवी सुधीर<br>NIKAM MADHAVI SUDHIR<br>ए२/५०३, पुण्योदय पार्क, डॉन बॉस्को शाळेजवळ, आधारवाडी, कल्याण (प.), -४२१ ३०१. | सहाय्यक प्राध्यापक |

⁄महिला

## महिला गट क्र. २ - विज्ञान व वाणिज्य शाखेतील शिक्षकांसाठी ( १ जागा)

| क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | ⁄आरती प्रसाद<br>AARTI PRASAD<br>बी-२३, हिमालया सोसायटी, असल्फा, घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८४. | सहयोगी प्राध्यापक |
| २ | ⁄रावल सुवर्णा तुकाराम<br>RAWAL SUVARNA TUKARAM<br>ओम निवास, १७, सदिच्छा को.ऑप.हा.सो.,चूर्नीपाडा, रान्हल, ता. भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०२. | सहयोगी प्राध्यापक |

⁄महिला

**महिला गट क्र. ३ तंत्रज्ञान, विधी आणि ललित कला(फाईन आर्ट) शाखेतील शिक्षकांसाठी (१ जागा)**

तसेच आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, तंत्रज्ञान, विधी आणि ललित कला(फाईन आर्ट) शाखेतील शिक्षकांच्या निवडणूकीसाठी कलम २५(२)(पी) मधील तरतूदीनुसार एका जागेसाठी सावंत अनुपमा जयवंत (अधिव्याखाता निवडश्रेणी) यांचा एकच नामनिर्देशन अर्ज योग्य प्रकारे असल्याचे आढळल्याने सावंत अनुपमा जयवंत यांची अधिसभेवर तंत्रज्ञान, विधी आणि ललित कला (फाईन आर्ट) शाखेतील शिक्षकांमधुन बिनविरोध निवड झाली आहे, असे जाहिर करण्यात येत आहे.

**विमुक्त जाती व भटक्या जमाती (DTNT)(सर्व शाखेतील शिक्षकांसाठी)(१ जागा)**

| क्र. | उमेदवाराचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | /रावल सुवर्णा तुकाराम<br>RAWAL SUVARNA TUKARAM<br>ओम निवास, १७, सदिच्छा को.ऑप.हा.सो.,चूर्नीपाडा, रान्हल, ता. भिवंडी, जि. ठाणे-४२१ ३०२. | सहयोगी प्राध्यापक |
| २ | शेकाडे वसंत सिताराम<br>SHEKADE VASANT SITARAM<br>परशूराम अपार्टमेंट, झेडपी-शाळा नं.२ जवळ, कणकवली(बनकर वाडी), जि. सिंधुदुर्ग-४१६ ६०२. | सहाय्यक प्राध्यापक |

/ महिला

**इतर मागासवर्ग (सर्व शाखेतील शिक्षकांसाठी) ( १ जागा)**

तसेच आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, इतर मागासवर्ग प्रवर्गातील (सर्व शाखेतील शिक्षकांसाठी) शिक्षकांच्या निवडणूकीसाठी कलम २५(२)(पी) मधील तरतूदीनुसार एका जागेसाठी पवार विजय नामदेव (सहाय्यक प्राध्यापक) यांचा एकच नामनिर्देशन अर्ज योग्य प्रकारे असल्याचे आढळल्याने पवार विजय नामदेव यांची अधिसभेवर इतर मागासवर्ग प्रवर्गातील(सर्व शाखेतील शिक्षकांसाठी) शिक्षकांमधुन बिनविरोध निवड झाली आहे, असे जाहिर करण्यात येत आहे.

१. मतपत्रिकेद्वारे मते नोंदविण्याची कार्यपध्दती परिनियम ३७३ व कलम ११५(२)(१२) यात नमूद केलेल्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे असेल.

अ) निवडणूक अधिकारी निवडणूक केंद्रावरील व्यवस्थालत नीट ठेवेल.

ब) कोणत्याही मतदाराला मतदानासाठी निश्चित केलेली वेळ संपल्यानंतर मतदान केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

क) प्रत्येक मतदाराला त्याचे मत गुप्तपणे देणे सोयीचे व्हावे यासाठी मतदान अधिका-याला योग्य वाटेल त्याप्रमाणे आवश्यक तेवढे कक्ष प्रत्येक निवडणूक केंद्रावर ठेवण्यात येतील.

ड) निवडणूक अधिकारी मतदान केंद्रावर हजर असलेल्या एक किंवा अनेक उमेदवारांना आणि /अथवा त्यांच्या एक किंवा अनेक प्रतिनिधींना मतदान चालू होण्यापूर्वी मतपेटया रिकाम्या असल्याचे दाखवेल आणि त्यानंतर त्या कुलुप बंद करून सिल लावून वापरण्यात येतील.

ई) मतदारांना मतपत्रिका देण्यापूर्वी स्थळप्रतीवर मतदाराचा क्रमांक टाकण्यात येईल आणि मतदाराची सही घेण्यात येईल आणि मतपत्रिका देणारा अधिकारी त्याच्याकडील मतदार यादीच्या प्रतीवर मतदाराच्या क्रमांकावर खुण करेल.

फ) मतदार त्याला मतपत्रिका मिळाल्यावर ताबडतोब मतदान कक्षात जावून तो/ती मतपत्रिकेवर खूण करून त्याची/तिची मतपत्रिका मत पेटीमध्ये टाकेल.

च) प्रत्येक मतदार गैरवाजवी उशीर न करता आपले मत देईल व तो/ती त्याची/तिची मतपत्रिका मतपेटीमध्ये टाकल्यावर ताबडतोब मतदान केंद्र सोडेल.

छ) जर एखाद्या मतदाराने त्याची मतपत्रिका अनवधानाने खराब केल्यास त्याला दुसरी मतपत्रिका देण्यात येईल आणि मतदान अधिकारी त्याची स्थळ प्रत रद्द करेल.

ज) प्रत्येक मतदार त्याच्या/तिच्या डाव्या हाताची तर्जनी निवडणूक अधिकारी किंवा मतदान अधिका-यांना तपासण्याकरिता दाखवेल आणि त्यावर चिरस्थायी शाईची खूण (Indelible Inkmark) करण्यात येईल.

झ) जर एखादा उमेदवार सर्वसाधारण जागेवर तसेच आरक्षित जागेसाठी निवडणूक लढवित असेल आणि तो सर्वसाधारण व आरक्षित जागेवर निवडून आला तर तो अशा निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यापासून चार दिवसात कुलसचिवांना लेखी स्वरूपात उमेदवाराच्या सहीसह वरील पैकी कोणत्या वर्गाचे प्रतिनिधीत्व तो करू इच्छितो हे कळवेल व अशी निवड निर्णायक राहिल.

त½ जर अशा उमेदवाराने वर नमुद केलेल्या मुदतीत त्याचा निर्णय घेतला नाही तर त्याने कुठल्या वर्गाचे प्रतिनिधित्व करावे हे कुलगुरू ठरवतील आणि त्यांचा निर्णय अंतिम राहिल.

.....५/-

२. वर नमूद केलेल्या जागांच्या निवडणूकीकरीता मतदार एकत्रित मतदान करेल, मतदार अशी खात्री करुन घेतील की मतपत्रिकेतील पसंतीक्रमाच्या रकान्यात प्रत्येक वर्गातील उमेदवाराच्या नावासमोर १ आकडा स्वतंत्रपणे लिहितील आणि त्यानंतर इतर उमेदवारांच्या नावासमोर २ ,३ , ४ असे आकडे लागोपाठ लिहितील.

३. जोडपत्र "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर मतदारांना मत पत्रिका बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१० रोजी सकाळी • ते संध्याकाळी ५.०० या वेळेत देण्यात येतील मतदानासाठी मतपेटया दिनांक २२ डिसेंबर, २०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उघडया राहतील, सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर येणा-या मतदारांना मतपत्रिका मिळणार नाहीत

४. मतदारांची ओळख या परिपत्रकासोबत त्यांना देण्यात आलेल्या ओळख पत्रावरुन तसेच मतदार यादीवरून तपासण्यात येईल

५. सदर निवडणूक ही एक हस्तांतरणीय मत या प्रकारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीने घेण्यात येईल वर नमुद केलेल्या अधिनियमाच्या कलम ४७ आणि ११५(२)(१२)या सह परिनियम ३७१ वाचून मतदाराने त्याचे/तिचे मत खालील प्रमाणे द्यावे.

अ) त्याला/तिला ज्या उमेदवारांना मत द्यावयाचे असेल त्याच्या नावासमोरील पसंतीक्रम या रकान्यात १ हा क्रमांक त्याच्या/तिच्या मतपत्रिकेवर असला पाहिजे आणि

ब) या व्यतिरिक्त त्याला / तिला जितक्या उमेदवाराला त्याच्या/तिच्या आवडीनुसार किंवा पसंतीनुसार मत द्यावयाचे असेल त्यांच्या नावासमोर २ ,३ ,४ असे लागोपाठ आकडे टाकावेत.

६. उमेदवार किंवा त्याचा/तिचा निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी ज्याला त्याने/तिने प्राधिकृत केले आहे ते मतदान केंद्रामध्ये हजर राहू शकतील परंतू त्यांच्यापैकी केवळ एकालाच एकावेळी आत प्रवेश मिळेल मतदान केंद्रामध्ये प्रवेश करु इच्छिणा-या निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी यांना संबंधित उमेदवाराने सही करुन दिलेले नियुक्ती पत्र ज्यामध्ये त्याला/तिला मतदान केंद्रामध्ये त्याच्या/तिच्या वतीने हजर राहण्यास प्राधिकृत करण्यात आलेले आहे ते पत्र निवडणूक अधिका-याला सुपूर्द करावे लागेल.

७. मतपत्रिका छाननी आणि मोजणी गुरूवार दिनांक २३ डिसेंबर, २०१० रोजी दुपारी २.०० वा. पासून सर कावसजी जहांगीर हॉल (दीक्षांत सभागृह), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -४०० ०३२, येथे करण्यात येईल व त्यानंतर निवडणूकीचा निकाल जाहीर करण्यात येईल. उमेदवार किंवा त्याने/तिने प्राधिकृत केलेला त्यांचा प्रतिनिधी छाननीच्या वेळेला हजर राहू शकेल परंतू त्यांच्यापैकी एकच व्यक्ती मोजणीच्या वेळी हजर राहू शकेल.

## मतदारांसाठी सूचना

(१) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४च्या कलम ४७(ब) व परिनियम क्रमांक ३५३ नुसार निवडणुकांसाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार एकल संक्रमणीय मताद्वारे मतदान असेल.

(२) जेवढे उमेदवार निवडणुकीत उभे असतील तेवढयाच उमेदवारांना मतदार मतदान करु शकेल.

(३) मतदान पत्रिकेवरुन मतदाराची ओळख कोणत्याही प्रकारे होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच मतदान पत्रिकेवर पसंतीक्रमाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची खूण, चिन्ह, सही ई. आढळल्यास मतपत्रिका अवैध ठरविण्यात येईल.

(४) फक्त निळया किंवा काळया शाईचे बॉल पेन वापरावे. (मतदान केंद्रात पेन उपलब्ध करून देण्यात येईल.)

(५) मतपत्रिकेवर इंग्रजी किंवा मराठी क्रमांकाने पसंतीक्रम दर्शवावे. (The order of preference shall be either in English OR Marathi only)

(६) मतपत्रिकेवर इंग्रजी व मराठी असे दोन्ही प्रकारचे पसंतीक्रम दर्शविण्यात येऊ नयेत.

(७) मतदान पत्रिकेवर पसंतीक्रम देताना (order of preference) एकाच पध्दतीचा अवलंब करावा. उदा. १० उमेदवार असल्यास त्यांच्या आडनांवाप्रमाणे मतदान पत्रिकेवर नावांचा समावेश असेल व त्यातील आपल्या पसंतीच्या कोणत्याही उमेदवारास पसंतीक्रम १ किंवा 1 देणे बंधन कारक असेल. त्यानंतर क्रमांक २ किंवा 2, ३ किंवा 3, ४ किंवा 4, ५ किंवा 5, ६ किंवा 6, ७ किंवा 7, ८ किंवा 8, ९ किंवा 9, १० किंवा 10 असे पसंतीक्रम देता येतील.

(८) 01/०१, रोमन I किंवा एक/ONE असे पसंतीक्रम देखील दर्शवू नयेत.

.....६/-

**वैध/अवैध मतदान पत्रिका** (काही उदाहरणे)

| उमेदवाराचे नांव | पसंती क्रम | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वैध | | | | अवैध | | | | |
| A | १ | २ | 1 | २ | | 0 1 | ७ | I | २ |
| B | | १ | | | २ | 2 | ९ | VI | I |
| C | | ३ | 2 | ३ | तीन | 3 | १० | II | 3 |
| D | | ४ | | | Four | 4 | | VII | 4 |
| E | | १० | | १ | Five | | ५ | III | |
| F | | ५ | 3 | | सहा | 6 | | VIII | |
| G | | ९ | | | | | | IX | |
| H | | ६ | | | | | ४ | V | |
| I | | ७ | | | | | २ | X | |
| J | | ८ | | | | | १ | IV | |
| | अ | ब | क | ड | ई | फ | च | छ | ज |

अ - **मतपत्रिका वैध,** ब - **मतपत्रिका वैध,** क - **मतपत्रिका वैध,** ड - **मतपत्रिका वैध,** ई - मतपत्रिका अवैध, फ - मतपत्रिका अवैध, च - मतपत्रिका दोन नंतर बाद होईल, छ - मतपत्रिका अवैध, ज - मतपत्रिका अवैध.

## उमेदवारांसाठी सूचना

(१) मतदान केंद्रावर प्रतिनिधींची नेमणूक करण्यासाठी उमेदवाराने कुलसचिव- तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांना मतदानाच्या कामाच्या ६ दिवस अगोदर दोन फोटोसह नमुना (अ) मधे अर्ज करावा लागेल.

(२) प्रत्येक मतदान प्रतिनिधींला नमुना (ब) प्रमाणे ओळखपत्र देण्यात येईल.

(३) मतदान केंद्र तसेच मतदान केन्द्राच्या परिसरापासून १०० मीटर अंतराच्या आत कोणत्याही संस्था/ उमेदवार/प्रतिनिधी वा अन्य कोणालाही कोणत्याही प्रकारची भित्ती पत्रके, झेंडे अथवा बॅनर्स मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी लावण्यास बंदी असेल. विद्यापीठ निवडणूक विभागाच्या निवडणुकीसंबंधीत वाहनाव्यतीरिक्त अन्य कोणत्याही वाहनास मतदान केंन्द्राच्या परिसरात प्रवेश करता येणार नाही.

(४) मतदान केंन्द्राच्या परिसरात फक्त उमेदवार व त्यांचे अधिकृत प्रतिनिधी, मतदार आणि निवडणुकीसंबंधीची कर्मचारी/अधिकारी यांनाच प्रवेश असेल.

(५) बोगस मतदार आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(६) सुचनांचे उल्लघंन करणा-यांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(७) मतदार केंन्द्रावर निवडणूकीसबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास निवडणूक अधिकारी परिनियम व कायद्याच्या आधारे कुलसचिव-तथा-निवडणूक निर्णय अधिकारी आणि कुलगूरुंच्या सल्याने योग्य तो निर्णय घेण्यास सक्षम असेल.

(८) मतपत्रिकेवरिल उमेदवारांची क्रमवारी इंग्रजी अक्षराप्रमाणे असेल व मतपत्रिकेवर इंग्रजी आणि मराठीमध्ये नावे असतील.

.....७/-

## नामनिर्देशन अर्जाच्या छाननीकरिता/मतमोजणीकरीता महत्वाच्या सूचना :-

(१) नामनिर्देशन अर्जाची छाननी करताना उमेदवार/सूचक/अनुमोदक/प्रतिनिधी यांपैकी कुणीही एक उपस्थित राहू शकेल.

(२) उमेदवार स्वत: हजर राहू शकत नसल्यास तसा अर्ज कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी यांना दोन दिवस अगोदर द्यावा त्यावर सूचक/अनुमोदक/ प्रतिनिधीचे नाव व मतदार यादीतील क्रमांक आणि स्वत:ची व सूचक/अनुमोदक/प्रतिनिधीची स्वाक्षरी असावी. अर्जाचा नमुना (क) पहावा

(३) उमेदवार स्वत: उपस्थित राहणार असल्यास अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

(४) अर्ज केल्यावर निवडणूक विभागातुन नमुना ''ब'' प्रमाणे ओळख पत्र देण्यात येईल. ओळख पत्राशिवाय कुणालाही आत प्रवेश करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(५) उमेदवाराने नामनिर्देशनासंबंधी आवश्यक ती कागदपत्रे छाननीच्या वेळेस स्वत:जवळ बाळगावीत. (नामनिर्देशन अर्जातील शपथ पत्रामध्ये दिलेल्या पात्रते संबंधी उपस्थितांमधील कुणीही आक्षेप घेतल्यास व संबंधीत कागदपत्रांची मागणी केल्यास त्या उमेदवारास त्याचवेळी कागदपत्र सादर करावे लागतील. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.)

(६) प्रवेशपत्र हे अहस्तांतरणीय असेल, उल्लघंन केल्यास उमेदवार अथवा त्याचा प्रतिनिधी कारवाईस पात्र ठरेल. मतमोजणीच्या वेळी स्वत: उमेदवार व एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

(**ताजा कलम** :- मतदारांना विनंती करण्यात येते की त्याने/तिने आपले ओळख पत्र मतदानासाठी निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर मतदानाच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामूळे विद्यापीठाने दिलेले ओळख पत्र प्राप्त न झाल्यास महाविद्यालयाने दिलेले ओळख पत्र किंवा निवडणूक आयोगाने दिलेले ओळख पत्र आणणे आवश्यक आहे. कोणत्याही मतदाराला ओळखपत्राशिवाय त्याचे/तिचे मत देता येणार नाही. तसेच मतदानाकरिता निश्चित केलेल्या मतदान केंद्राशिवाय इतर मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही.)

प्रति,
मतदार यादीतील सर्व शिक्षक.

सही/-

(प्राचार्य एम्.एस्.कुऱ्हाडे)
प्रभारी कुलसचिव
तथा निवडणूक निर्णायक अधिकारी

स्थळ- मुंबई.
दिनांक- ९ डिसेंबर, २०१०

इलेक्शन२०१०/मराठी(२)निदिप्र